| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | 2025<br><br>CB/ 33/2025 |

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ०२.०६.२०२५**

**'' प्रशांत लॉजिंग, विसराळी नाका, मुंबई मर्कन्टाईल बॅकेसमोर, एमसीसीएच सोसायटी, मुंबई पुणे रोड, पनवेल येथील चालणा-या वेश्याव्यवसायातुन ०५ पिडीत महिलांची अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीसांनी केली सुटका ''**

..........................................................................................................................................

श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री. संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि/पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक ३०/०५/२०२५ रोजी त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,''प्रशांत लॉजिंग, विसराळी नाका, मुंबई मर्कन्टाईल बॅकेसमोर, एमसीसीएच सोसायटी, मुंबई पुणे रोड, पनवेल'' येथिल मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकास वेश्यागमनासाठी महिला दाखवून वेश्या व्यवसाय करीत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली.

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास प्रशांत लॉजिंग, विसराळी नाका, मुंबई मर्कन्टाईल बॅकेसमोर, एमसीसीएच सोसायटी, मुंबई पुणे रोड, पनवेल, येथे पाठवले असता बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरुन पथकाने २२:२३ वाजता लॉजवर छापा टाकला. त्यावेळी त्याठिकाणी ०५ महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मधील वेटर अरुणकांत राजनारायण चतुर्वेदी, तसेच मॅनेजर राजु विनोद दास यानी वरील पिडीत महिलांना मयुर डावरे रा. डेरिवली, पनवेल (महिला पुरवणारा) याच्याकडुन प्राप्त करून, त्यांना लॉज मध्ये ठेवुन वेटर अरुणकांत चतुर्वेदी यांने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबदला म्हणुन ५५००/- रुपये वेटर अरुणकांत चतुर्वेदी यांने बनावट ग्राहक यांच्याकडुन स्वीकारले.

त्यावरुन आरोपी १) राजु विनोद दास, (लॉज मॅनेजर), २) अरुणकांत राजनारायण चतुर्वेदी, (वेटर), ३) तसेच पाहिजे आरोपी मयुर डावरे (महिला पुरवणारा), ४) अरुण शेटटी मो ९३२३८१२४४१ (लॉज चालक) यांनी आपसात संगणमत करून सहा पिडीत महिला यांना प्राप्त करून नमुद लॉज वेश्याव्यवसायासाठी वापरला.

**म्हणून वरील आरोपी व पाहिजे आरोपी यांच्या विरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २९३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाणे करत आहे.**

**सदर गुन्हयात आरोपी क्रमांक १ व २ यांना दिनांक ३१/०५/२०२५ रोजी १०.१२ वाजता अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक ०२/०६/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे.**

सदरचे कारवाई मध्ये सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा,यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/ मांडोळे, पोशि/ ठाकुर, पोशि/ चव्हाण, पोहवा/ धोनसेकर, चालक पोहवा/मोहिते हे सहभागी होते.

★★★★★★★★★★★